शिक्षण झाल्यानंतर काय?
माझं भवितव्य काय?
आज जे आयुष्य मी जगतोय
त्याच्यापेक्षा अधिक अर्थपूर्ण आयुष्य
कसं जगता येईल? ..
अशा छळणाऱ्या प्रश्नांनी
अस्वस्थ झालेल्या युवक-युवतींसाठी...

YES WE CAN!





# निर्माण !

कशासाठी जगायचं? - शोधा उत्तर..

# कशासाठी जगायचं? - शोधा उत्तर..

कशासाठी घेतो आपण शिक्षण?
शिक्षण झाल्यानंतर काय?
नेमकं करायचं तरी काय? आपलं भवितव्य काय?
काहीतरी करायचंय; पण हे 'काहीतरी' म्हणजे नक्की काय?
आयुष्य म्हणजे काय?
कशासाठी जगतो आपण?
शिक्षण, नोकरी, लग्न, मुलंबाळं, सुखासिन आयुष्य?..
'हे' आणि याच्याशी निगडित असल्याच आणखी काही गोष्टी म्हणजे आयुष्य?
आयुष्यात, जीवनात आपण खरंच काय करणार आहोत?
पैसा, घर, सत्ता-संपत्ती, मान-मरातब या प्रस्थापित चौकटीत आयुष्यभर फिरणार आहोत, जसा वारा वाहात असेल त्याप्रमाणे भरकटत जाणार आहोत, 'नियती' ठरवेल त्याप्रमाणे जगणार आहोत की केलेल्या कामाचं समाधान मिळवून देणारी आडवाट आपण चोखाळणार आहोत?
पडतात तुम्हाला असले प्रश्न कधी?
नक्कीच पडत असणार.
त्यामुळे तुम्ही अस्वस्थही होत असणार.

●●

आज जे आयुष्य मी जगतोय त्याच्यापेक्षा अधिक अर्थपूर्ण आयुष्य कसं जगता येईल? समाजाचा आपण एक घटक आहोत. आपली क्षमता, आपली कौशल्ये यांचा समाजासाठी कसा उपयोग करता येईल?..
अशा छळणाऱ्या प्रश्नांनी अस्वस्थ झालेल्या युवक-युवतींना स्वतःचा व स्वतःच्या भवितव्याचा शोध घेता यावा, 'कशासाठी जगायचं?' या प्रश्नाचं उत्तर शोधता यावं यासाठी 'निर्माण' नावाचा एक उपक्रम आणि शिक्षण प्रक्रिया डॉ. अभय व राणी बंग, दत्ता बाळसराफ तसेच 'निर्माण'च्या टीमने उपलब्ध करून दिला आहे.
आजचे अर्थलोभी वातावरण आणि परीक्षार्थी बनवणारं शिक्षण यामुळे समृद्ध, समाधानी आणि उद्देशपूर्ण जीवनापासून युवक वंचित राहात आहेत. त्यामुळेच विविध सामाजिक, वैज्ञानिक आणि तांत्रिक आव्हान स्वीकारायला सक्षम आणि इच्छुक अशा युवा 'चेंज मेकर्स'ची आपल्याला सातत्याने चणचण भासत असते. 'निर्माण'च्या माध्यमातून स्वतःचा व स्वतःच्या भवितव्याचा शोध घेतानाच असे युवा 'चेंज मेकर्स' उपलब्ध व्हावेत या उद्देशाने 'निर्माण' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.
'निर्माण'च्या माध्यमातून २००६ ते २००९ या कालावधीत झालेल्या दोन बॅचमध्ये महाराष्ट्रातील शंभरपेक्षा अधिक युवक-युवती सहभागी झाले होते.
'निर्माण'ची तिसरी बॅच जानेवारी २०१० मध्ये सुरू होत असून, त्यासाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २००९ ही आहे.

## निर्माण शिबिराचे स्वरूप

१८ ते २६ वयोगटातील निवडक ६० तरुण-तरुणींची या बॅचसाठी निवड केली जाईल. निवड झाल्यानंतर सहा महिन्यांतून एकदा अशी दोन वर्षात चार शिबिरांची मालिका घेतली जाईल. प्रत्येक शिबिर सुमारे ७ ते ९ दिवसांचे असेल. अनुभवात्मक शिक्षणावर भर देतानाच समाजातील समस्यांचे प्रत्यक्ष दर्शन शिबिरार्थींना घडविले जाईल. महाराष्ट्रातील अनेक तज्ज्ञ व प्रख्यात व्यक्तिमत्त्वांसोबत शिबिरादरम्यान चर्चा होईल व त्यांचे मार्गदर्शन घेतले जाईल.
'शोधग्राम' सर्च, गडचिरोली येथे ही शिबिरे होतील. शिक्षण सुरू असलेल्या विद्यार्थ्यांनाही या शिबिरात सहभागी होता येईल.
पहिल्या शिबिरात स्वतःबद्दल आणि स्वतःची खरी 'ओळख' होण्याबद्दल शिबिरार्थींना मार्गदर्शन केले जाईल. समाजात, निसर्गात जे प्रश्न दिसतात आणि या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ज्यांनी आपला सहभाग दिला आहे अशा ज्येष्ठांचं मार्गदर्शन आणि त्यांच्या अनुभवांचा समावेश दुसऱ्या शिबिरात असेल. तिसऱ्या शिबिरात प्रत्यक्ष खेड्यात राहून तिथल्या जीवनाच अनुभव शिबिरार्थींना दिला जाईल. चौथ्या आणि शेवटच्या शिबिरात 'आता पुढे काय करायचं?' याबाबतची चर्चा आणि आखणी करण्यास शिबिरार्थींना मदत केली जाईल.
या आडवाटांनी प्रेरित झालेल्यांना एक वर्षासाठी फेलोशिपही दिली जाते आणि या काळात एखाद्या प्रश्नावर त्यांनी पूर्ण वेळ प्रत्यक्ष कृती करणे अपेक्षित आहे.
गेल्या दोन वर्षात सुमारे १५ तरुणांना ही फेलोशिप मिळाली असून, विविध प्रश्नांवर त्यांनी काम केलं आहे. यातील काही जण त्या त्या प्रश्नांवर आता स्वतंत्रपणेही काम करीत आहेत.
यातील काही जणांनी कुपोषणावर काम केलं, काहींनी आरोग्यावर काम केलं, कुणी शिक्षणावर, कुणी पर्यावरणावर, कुणी बेरोजगारी आणि रोजगार हमीच्या प्रश्नावर तर कुणी पाणीटंचाईच्या प्रश्नावर काम केलं. 'निर्माण'च्या शिबिरांतून गेलेल्यांना ही फेलोशिप मिळते आणि त्या काळात शिबिरार्थींना आर्थिक मदतही दिली जाते. त्याचबरोबर अनुभवी मार्गदर्शक आणि नामांकित संस्थांच्या माध्यमांतून विविध क्षेत्रांत कामाची संधीही त्यांना मिळू शकेल.
'निर्माण'च्या प्रत्येक शिबिराची फी साधारण एक ते दीड हजार रुपये आहे. मात्र निवड झालेल्यांपैकी ज्यांना ही फी भरणे शक्य नसेल त्यांना पूर्ण रकमेची शिष्यवृत्तीही मिळू शकते.
आडवाटा खुणावत असतील आणि या आडवाटांची माहिती करून घ्यायची असेल तर आपणही 'निर्माण'च्या शिबिरांत सहभागी होऊ शकता.
(शिबिराचे कुठलेही 'प्रमाणपत्र' मात्र मिळणार नाही.)
'निर्माण'ची अधिक माहिती आणि अर्ज http://nirman.mkcl.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. हा अर्ज ई-मेलने अथवा पोस्टानेही पाठविता येईल.
संपर्क - दत्ता बाळसराफ- ९८९२७१३०४९
अमृत बंग - ९४२२५०१४९६

●●

